2020-21

SIMRJ ISSN: 2455-1511 Vol. VI Issue-I Jul-Aug-Sep 2020

SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj

उषाकिरण आत्राम यांच्या 'म्होरकी' मधील काही लक्षवेधक कविता

प्रा.डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ता. आबेगाव जि. पुणे

प्रास्ताविक:

आदिवासी साहित्यक्षेत्रात कवितेच्या प्रातांतील पहिल्या पिढीतील कवयित्री म्हणून उषाकिरण आत्राम प्रसिद्ध आहेत. त्यांचा गोंडी भाषेतील पहिला कवितासंग्रह 'मोटयारिन' (१९९३) साली प्रसिद्ध झाला. आजपावेतो या पहिल्या संग्रहाच्या तीन आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत. त्यांचा 'म्होरकी' हा दुसरा कवितासंग्रह दि. २२ फेब्रुवारी १९९७ रोजी नागपूरच्या गोंडवाना गोंडी साहित्य परिषदेने प्रसिद्ध केलेला आहे. या संग्रहाला 'मधुकर केचे काव्य पुरस्कार' प्राप्त झालेला आहे. तर तिसरा कवितासंग्रह 'मराठी बालगीतसंग्रह' (२००१), चौथा कवितासंग्रह 'लेखनीच्या तलवारी' (२००८) साली प्रसिद्ध झालेला आहे. त्यांच्या अनेक कविता विविध मासिके, त्रैमासिके, वृत्तपत्रे, स्मरणिका, इ. मधून प्रसिद्ध झालेल्या आहेत. हिंदी, उर्दु, इंग्रजी भाषेत त्यांच्या कवितेचे अनुवाद झालेले आहेत. महाराष्ट्रातील शालेय, महाविद्यालयीन व विद्यापीठीय अभ्यासक्रमात त्याच्या कविता व कथालेखनाचा समावेश झालेला आहेत.

त्यांच्या 'म्होरकी' या दुसऱ्या कवितासंग्रहाबद्दल येथे विवेचन मला अपेक्षित आहे. 'म्होरकी' म्हणजे गोटुलातील प्रमुख स्त्री होय. म्होरकी जिद्दी, हुशार, निर्भिड असते. म्होरकीच्या नेतृत्त्वाखाली अन्याय – अत्याचाराविरोधात लढा पुकारला जातो. आदिवासी स्त्रियांची आश्वासक शक्ती व सामर्थ्य म्होरकी असते. गोटुल हे आदिमांचे ज्ञानकेंद्र आहे. युवागुह आहे. यासंग्रहाच्या 'दोन शब्द ... माझे' मध्ये त्यांनी ''शिक! पोराइतकीच निर्भिड हो! तुला सारचं आलं पाहिजे.'' ('दोन शब्द ... माझे' पृ.क्र.७) हे आपल्या वडिलांचे स्वप्न कवयित्रीने वास्तवात साकार करून दाखविले आहे. आपल्या कवितेविषयी कवयित्री लिहितात की, ''माझी कविता स्वअनुभवातून, स्त्री अत्याचार, अन्यायातून, त्यांच्या

हुंदक्यातून, आक्रोशातून निघालेला हुंकार आणि जीवंत सत्य आहे. हिला ना मिळाला कौटुंबिक वारसा, ना मिळाला आप्त गोतावळा, जे अनुभवले, भोगले, पाहिले व जे वाटले ते लिहिले. मला माहित आहे, साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र यांचे निकष यांत माझी कविता बसू शकणार नाही. असेच प्रांजळ शिक्कामोर्तब तिच्यावर केल्या जाईल. पण मला त्याची पर्वा नाही.'' ('दोन शब्द ... माझे' पृ.क्र.८) अशी आपल्या काव्यलेखनाची प्रामाणिकपणे भूमिका व्यक्त केली आहे. 'म्होरकी' या संग्रहात एकूण ५१ कविता आहेत. त्यापैकी काही लक्ष वेधून घेणाऱ्या कवितांची विवेचन खालील प्रमाणे करता येईल.

त्यांच्या 'जथे', 'मोहरकी', 'जन्म न देणाऱ्या मांची कथा', 'मी व कोणाची', 'शृंगार', 'बिरसा मुंडा', 'प्रित', 'सांग राणे', 'आसू! टिपागड पहाडीतले!!', 'माही दुनिया बुडाली', 'आश्रम शाळा' इ. काही कविता मराठी वाचकाचं लक्ष वेधून घेणाऱ्या आहेत. आदिवासी स्त्रीच्या पारंपरिक भूमिकेला नकार, विद्रोह आणि ऐतिहासिक चिकित्सा ही उषाकिरण आत्राम यांच्या काव्यलेखनाची वैशिष्टये आहेत.

'जगापासून दूर – दूर' या कवितेतून जगाच्या पाठीवर अत्यंत मागासलेला आद्यमानव समूह म्हणजे आदिवासी होय. जंगलविश्वाशिवाय ज्ञान – विज्ञान, तंत्रज्ञानाचा त्याला अजून फारसा परिचय नाही. अपरिहार्यपणे मरण येत नाही म्हणून तो जगतो आहे. आपल्या देहाची, जीवनाची वजाबाकी करण्याचे त्याला कोणी शिकविले नाही. जगण्याचं कोणतंही प्रयोजन नसताना दुःखमुक्तीसाठी रेलाँसारख्या सांस्कृतिक संदर्भाचा आधार घेतला जातो आहे. तो असा की –

''दुःखाला विसरण्यासाठी
बांबुच्या सनईतून
चामडीच्या ढोलातून – धदक्... ढम... तालावर
रि.. रो... रे ला रे रि रो रे ला रे!'' (पृ.१०)

'पयसाची लाल आग व्हय!' या कवितेतून आदिवासी स्त्रीला मानाचे स्थान नाही, हे प्रतीत होते. पुरुषांच्या सौंदर्य उपभोगाचं एक साधन, डोंगरातील तिचे काबाडकष्ट, पुरुषांची तिरकस नजर यामुळे ती जंगलातच कैद झाली आहे. आदिम स्त्रीत्वाचा स्वाभिमान तुडवला जातो आहे. म्हणूनच आदिवासी स्त्रीने परंपराशरणतेचा त्याग करून नवं रूप धारण करावे, कारण काय तर

''वाटेनं – जातेस – तर समद्या डोयाले आग लागन
राणे! तुइयावर नजर समद्या सुधारलेल्या बाप्यायची'' (पृ.११)

म्हणून कवयित्री म्हणते,

''तू रातराणी होवू नगं!''
''व्हशील तं पयसाची लाल तांबडी आग व्हय!''
नायत् बिब्याची फुलं व्हय!'' (पृ.११)

अशी विद्रोहाची लाल आग धारण करणाऱ्या स्त्रिया गुडया – गुडयावर (पाडया – पाडयावर) आहेत. हाच कवयित्रीला त्यांचा शिणगार (शृंगार) वाटतो आहे.

'अत्त दिप भव' या कवितेत आपणच आपल्या प्रकाशाचे दीप व्हावे, आपणच आपले शिल्पकार व्हावे, असा संदेश मिळतो आहे. दुसऱ्याचा विश्वास, आशीर्वाद, दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिणे हे विश्वासघाताचे लक्षण आहे. कारण त्याच हाताने एकलव्याचा अंगठा घेतलेला आहे. म्हणून कवयित्री आदिमांना सावध करते की,

''तुम्ही असे कसे? दुसऱ्याच्या ओंजळीने पाणी पिता?
त्याच ओंजळी एकलव्याच्या अंगठयाचे रक्त पितात
कुणाच्या मंत्रतंत्र उपदेशवाणीवर भाळू नका
आपणच आपले जगणे – मरणे ठरवा!
आपणच आपला अत्त दिप व्हा ।।'' (पृ. १५)

असे परप्रकाशित अस्तित्व कवयित्रीने नाकारून प्रबुद्ध जाणीवेचा स्वीकार करण्याचा सल्ला दिला आहे.

कवयित्रीने शब्दांचे सामर्थ्य जाणले आहे. हेच शब्द मनामनातील अज्ञान, जळमटे दूर करणार आहेत. यावर कवयित्रीचा विश्वास आहे. म्हणूनच त्या आपल्या **'शब्द शस्त्र'** या कवितेत म्हणतात की,

''शब्दच शस्त्र, शब्दच अस्त्र
शब्दच युध्द, शब्दच बुध्द'' (पृ.२२)

अशी प्रबुध्द जाणीव कवयित्रीने व्यक्त केली आहे.

'शृंगार' ही कविता संवादात्मक आहे. या कवितेतील आदिवासी माय आपल्या लेकीला पारंपरिक बेडयातून मुक्त करीत आहे. अंगावर गोंदून घेणे, रेलाँत नाचणे, शरीर उघडे ठेवणे या परंपरागत भूमिकांना नकार देणारी माय आहे. या सर्व परंपरा पालनात मायचा जन्म गेला. स्वानुभवाने शहाणी झालेली माय आपल्या लेकीला परंपरा नाकारण्याचे सांगते आहे. कारण टेलर, सावकार, पुढारी, साहेब या सर्वांच्या कामुक नजरा भिरभिरत असतात. साध्या – भोळया गोंड कन्येला ढोलाच्या तालावर फसविले जाते.

म्हणून तिने शृंगार करू नये. रेलाँत नाचू नये. असा सावधानतेचा इशारा स्त्री रक्षणार्थ देते आहे. तो असा की,

''सावध हो — पोरी!
रान जळत आहे
फूल गळत आहे
''गोंदून निळी — होवू नगं काळी''
रानफुलासारखी डवरं
हो सुर्यसळी
हो नागकमळी
हो सुर्यफूल
हो तांबडी पळसाची लाल अंगार
तरच उठून दिसल
ह्या बाजार फुक्याले तुहा — ''शिणगार''

अशी विद्रोही शृंगाराची सूचकता कवयित्रीने प्रस्तुत कवितेत प्रकट केलेली आहे. (पृ.२६)

'जन्म न देणाऱ्या मांची कथा' या रचनेचा विचार करता, भारतभूमीचे आदिसंतान असलेल्या आदिवासींनी या मातृभूमीवर निर्व्याज प्रेम केले आहे. परंतु प्रस्थापित व्यवस्थेने मात्र या धरतीच्या लेकरांची बेशरमपणे थट्टा केली आहे. या धरतीच्या लेकरांना आईचं वात्सल्य प्रेम, माया, ममता कधी मिळाली नाही. म्हणून कवयित्री म्हणते की,

''फाटक्या आतडीला दोरा घातलाच नाही
मायेचं गर्भारमायपण मी भोगलचं नाही
मां म्हणून कुणी हाक मारलीच नाही''(पृ.२८)

'मी वं कोणाची'? या कवितेत आदिवासी गोंड स्त्री ही एक उपभोग्य वस्तू आहे, असे पुरुषप्रधान संस्कृती समजते. या कवितेत एका सासुरवाशीण गोंड कन्येची विवंचना लक्षात येते. पुरुषप्रधानतेचं वर्चस्व असणाऱ्या समाजात स्त्री म्हणजे पायताण, कुत्री असे समजले जाते. तिला कोणतेही हक्क व अधिकार नाही. आई — वडील, भाऊ, सासू — सासरा, शेजारी हे सर्वच तिच्यावर हक्क सांगतात. सावकार, जमीनदार, रेंजर, नवरा हे सुद्धा सासुरवाशीण स्त्रीवर अधिकार सांगतात. आपल्या कामपूर्तीचं साधन मानतात. अत्यंत उद्विग्न व हतबल मन:स्थितीत या कवितेतील गोंडकन्या म्हणते की,

''सांग माय मी वं कोणाची?
बापाची भावाची?

नवऱ्याची, सावकार, रेंजर, पाटील — ?
जमिनदारांची, शिंप्यांची, सोनाराची, की आणखी
सांग मी कोणाची — ?'' (पृ.३२)

'जथे' या कवितेत गतकाळातील आद्यमानवसमूह असलेला आजचा आदिवासी समाज बंदिस्त जीवन आता जगणार नाही. हीच भावना कवयित्रीने शब्दबद्ध केली आहे. उदा.

''कालची खुरटी झाडे आता गर्द पालवू लागली
पंख तुटलेल्या राव्यांची त्यावर गर्दी दिसू लागली
कालचे बंदिस्त रावे, पिंजरा तोडून आले
अन् बेलाशक झाडावरची फळं चाखून चव सांगू लागले'' (पृ.५२)

बंदिस्त जीवन व जंगलाश्रित जीवनाला नकार देऊन विकासाची फळे चाखायला मिळत आहे.

'मोहरकी' या कवितेत 'मोहरकी' म्हणजे गोंडातील घोटूलात स्त्रियांचं नेतृत्व करणारी नायिका होय. या कवितेत कवयित्रीने आपल्या सखीला विद्रोहाचा सल्ला दिला आहे. लाचारी, शोषण, अमानुषता, दुःख, दारिद्य या अवस्थेत किती दिवस राहायचे, हे सर्व नाकारून आपल्या सर्व सख्यांना सावधानतेचा इशारा दिला आहे, तो असा की,

''मी तुमची मोहरकी आहे
फेकून द्या ते फाटक्या पदरांचे बुजगावणे
सोडून फेका — बंदिस्त माळांचे जोखाडणे
नजरेतील भिंती टाकून द्या!
ही घ्या पेटती मशाल
मी निघाले — पाठीमागून तुम्ही या!'' (पृ.५२)

असे नवतेचे आणि सामाजिक बांधिलकीचे स्त्री नेतृत्व या रचनेतून प्रत्ययास येते.

'प्रित' या कवितेतून कवयित्रीने पृथक प्रेमविषयक भावना प्रकट केलेल्या आहेत. या कवितेतील प्रियकर प्रेयसी हे रानबांधवांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचार निर्मूलनासाठीच्या लढयासाठी सिद्ध आहेत. आदिमांची खोरी नासवणारी बेमुर्वत हरामखोरी धुवून काढून रान पुन्हा फुलारण्यासाठी रानकपारीतून आदिमांचा मोर्चा पुढे आल्यावर प्रेयसी प्रियकराला म्हणते की, ''प्रियत्तमा पहिली लढाई आपलीच!'' याच लढाईत बिरसा मुंडा फाशीवर गेला. एकलव्याचा अंगठा गेला. या घटनांची चुकती करू या. यासाठीच

''दूरवर... ऊलगुलान! ऊलगुलान!
गगनभेदी हुंकार रानभर धावत होते!'' (पृ.५९)

'परिवर्तन' या कवितेतूनही हाच सूर प्रकट होतो आहे. ही कविता परिवर्तनाचं उषासूक्त गाणारी आहे. परंपराशरणता टाळून नवसूर्योदयाची आस कवयित्रीला आहे. इतिहासातील क्रांतिकारकांच्या माध्यमातून कवयित्री आपली श्रद्धास्थाने शोधत आहे. त्यातून प्रेरणा मिळते. काल, परवापर्यंत गोंडी स्त्रीच्या राहणीमानाला फुसकी सदाशिव पेठ नावे ठेवत असत. हसत असत. परंतु परिवर्तनाभिमुख गोंडी स्त्रीला राणी दुर्गावती, तिलका, राणी हिराई, शूरप्रतापी रावण, एकलव्य, बिरसा मुंडा, संग्रामशहा, भिमूकुमरा, बाबूराव शेडमाके, तंटया भिल्ल, नारायणसिंह उईके या सर्व क्रांतिकारकांच्या बहादूर गप्पा गोष्टी ऐकवल्या आहेत. या सर्वांचा वैचारिक व क्रांतिकारक वारसा तिने स्वीकारल्यामुळे विद्रोहाचा सूर ती व्यक्त करते

''मक्तेदारी चालणार नाही!
ब्राह्मणशाही चालणार नाही!
आम्ही नाहीत हिंदू!
आम्ही आहोत कोयतूर
आमचा प्रकाश आम्हीच होवू!
परप्रकाशी कधी न राहू!
गोंडवाना जागवा परकियांना भागवा'' (पृ.६१)

'बिरसा मुंडा' या कवितेत बिहारमधील आदिवासींचा स्वातंत्र्यसूर्य असलेल्या बिरसा मुंडा या क्रांतिकारकाचे कवयित्रीने केलेले वर्तमानातील स्मरण आहे. आजच्या वर्तमानातील आदिवासी स्त्रियांचा छळ, आदिम समाजाच्या व्यथा, वेदना, दुःख, भय यातून मुक्तता करण्यासाठी बिरसाने पुन्हा रूप धारण करावे. बिरसाचा 'ऊलगुलान' पुन्हा सुरू होण्याची ही विनवणी आहे. उदा.

'' बिरसा! तु पुन्हा एकदा ये रे बाबा
आम्हा आदीम मायांच्या कुशीत जन्माला
पुन्हा एकदा होवू दे ''ऊलगुलान'' (पृ.७५)

आदिवासींच्या शोषणमुक्त, भयमुक्त समाजरचनेसाठी बिरसाने आशादीप होऊन यावे.

'सांग राणे' या कवितेत कवयित्री आपल्या सखीला सटवीला जागृत करत आहे. कारण गोंड स्त्रियांना सांस्कृतिकतेच्या नावाखाली रेलाँ नृत्यात नाचवलं जातं. नासवलं जातं. नागवलं जातं. ही शोषक स्त्री जीवनाची वाटचाल कवयित्री रोखण्यास सांगते आहे.

''तू मात्र — दंडार ठेमस्यातच डुंबून जातेस
सांग राणे? तू कुठल्या भारताच्या मातीआड राहतेस?
सांग? तू कुठल्या भारताचं गीत गातेस?
रानशे! आता तरी बोलकी हो? (पृ.४२)

'आसू! टिपागड पहाडीतले!!' ही कविता टिपागड पहाडातल्या आदिवासींची वेदना शब्दबद्ध करते. मूळनिवासी व जंगलचे राजे आज मात्र मूलभूत समस्येमुळे वंचित आहेत. त्यांना गुन्हेगार, चोर ठरविले जात आहे. गडचिरोली, चंद्रपूर या परिसरातील नक्षलवादी गटांनी आदिवासी कुटुंबाचा छळवाद मांडला आहे. यामुळेच

''आमचं जगणं 'मरणं'
रोज डोयानं पाहातो
आम्ही इचारावं कोणा?
हे जीणं की 'मरण'?''

आदिवासींच्या मरणाला ते स्वत: साक्षी आहे. 'जगणं' आणि 'मरणं' ही नित्याची बाब झाली आहे.

'माही दुनिया बुडाली' या कवितेतील आदिवासी स्त्रीचं दु:ख जगावेगळं आहे. रानातील मोळी विकून उदरनिर्वाह करणारी, परंतु अपयश पदरी आल्यावर करुण दु:खाला सामोरे जावे लागते. मोळी विकून तापाने फणफणलेल्या मुलाला आंबील करून त्याला देत आहे, परंतु

''नाही हालला झूलला 'जीव कवासा उडाला'
भूकपायी तान्हा माझा 'जीव घेऊन निघाला''

'भूकबळी' हा आदिवासींच्या जीवनात भीषण रूप धारण करणारा आणि स्त्रियांना सतावणारा गंभीर प्रश्न आहे. यामुळे आदिवासी आईचे सर्वस्व असलेले मूल परिस्थितीने 'भूकबळी' ठरविले आहे.

'आश्रमशाळा' ही कविता आईशी संवाद साधणारी आहे. आश्रमशाळेमधून आदिवासी मुलामुलींचे शिक्षण होत असले तरी शोषणाधिष्ठीत, विषमताग्रस्त आश्रमशाळेतील शिक्षण, तेथील शिक्षकांवर कवयित्रीचा विश्वास नाही. कारण आश्रमशाळा हे स्त्रीशोषण, लैगिक छळ व विकृती, स्त्री लंपटता या सर्वांचं एक वासनाकेंद्र बनत चालल्याची खंत या कवितेतून प्रत्ययास येते. ज्ञानदानाऐवजी प्रेम, लैगिकता, अश्लीलता, शरीरसुख शिकवणाऱ्या स्त्रीलंपट व वासनाविकृतीने पछाडलेल्या काही शिक्षकांवर विश्वास राहिलेला नाही. यामुळे आश्रमशाळेतील मुलींचे भवितव्य अंधारात आहे. पावित्र्याची जागा काही बेईमान शिक्षकांनी घेऊन ते दलाल बनले आहेत. आश्रमशाळेचे वरिष्ठ अधिकारीही

सोयिस्करपणे दुर्लक्ष करतात. या शोषणातून मुक्त करणारा देवराया कोणीही नाही, अशी अगतिकता व हतबलता प्रत्ययास येते. म्हणून आश्रमशाळा म्हणजे

''हे तर ठरले आहे — नराधमाचे कुरण
आश्रमशाळा आदिवासी मुलांचे मरण
हे तर ठरले अब्रू शोषणाचे सरण
आश्रमशाळा अत्याचार अश्लीलतेचे तार
आई! आई! हे तर आदिवासी पिढीचे जीवंत मरण
रानातले सावज — दऱ्यातले नाग आणि वाघ बरे
पण शिकलेली माणसं — गुरू नाहीत — ग खरे''

गुरूमधील पशुत्ववृत्तीचा प्रत्यय घडविणारी ही कविता आहे.

'जखम' या कवितेतून कवयित्रीने मायलेकीचा संवाद प्रकट केला आहे. आदिवासींच्या दु:खाची जखम व खोली आजमावणे अशक्य आहे. हे दु:ख निर्माण करणाऱ्या पाखरांची गणती करणे अवघड आहे.

सारांश — आदिवासी कवींच्या पहिल्या पिढीतील प्रथम कवयित्री उषाकिरण आत्राम यांनी आदिवासी जाणीव — नेणीवेतून काव्यलेखन केले आहे. वरील त्यांच्या सर्वच कवितांमधून आदिवासी जीवनाच्या व्यथा, वेदना प्रकट होतात. नव्या आशयविश्वाची भर कवयित्रीने मराठीत साहित्यात टाकली आहे. प्रतिमासृष्टी सुद्धा आदिम जीवन संस्कृतीशी निगडित आहे. आदिवासी क्रांतिकारकांची प्रबळ प्रेरणा या कवितेला आहे. इतिहासातील पराक्रमी आदिवासी शूरवीर कवयित्रींची श्रद्धास्थाने आहेत. हे त्यांच्या कवितेतून प्रकर्षाने जाणवते.

संदर्भग्रंथ

१. आत्राम, उषाकिरण, 'म्होरकी' (कवितासंग्रह), प्र. आ. २२ फेब्रुवारी १९९७, गोंडवाना गोंडी साहित्य परिषद, नागपूर
२. तुमराम, विनायक, (संपादक), 'शतकातील आदिवासी कविता' प्र.आ. १ ऑगस्ट २००३. हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर